**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 40** **September - October - 2025**

# आदिवासींची धार्मिक संकल्पना

**प्रतिक चंद्रसेन आवारे**
*संशोधक विद्यार्थी,*
*रामनगर, के.एम.जे.एम.कॉलेज जवळ वाशी ता.वाशी जि.धाराशिव*
*Corresponding Author – प्रतिक चंद्रसेन आवारे*
**DOI - 10.5281/zenodo.17662240**

आर्यांचे हिंदुस्थानात आगमन होण्यापूर्वी आदिवासी हेच या देशाचे मुळ मालक होते. आर्यांच्या या टोळ्यांनी गंगेच्या काठी, खोऱ्यात व परिसरात घाम गाळून, कष्ठ करून शेती मध्ये हरितक्रांती करणाऱ्या निष्पाप आदिवासीवर शस्त्रधारी आर्यांनी हल्ला चढविला. त्यांची जनावरे, शेती व धान्य हस्तगत करून त्यांच्याशी मोठे रक्तरंजित युध्द केले. त्यात अनेक आदिवासींची मोठी प्राणहानी झाली. त्यामध्ये अनेक अदिवासींच्या कत्तली झाल्या, अनेकांनी शरणांगती पत्कारली तर उरल्या-सुरल्या आदिवासींनी भितीपोटी घनदाट अरण्याचा रस्ता धरला, तो आजतागायत सुटलेला नाही.

जगाच्या पाठीवर असा एकही देश नाही की, त्या देशाला धर्म नाही. भारतामध्ये तर विविध जाती - धर्माचे लोक गुण्या-गोविंदाने नांदत असल्याचे दिसून येते. मात्र भारत देशातीलच आदिवासी ही एकमेव जमात अशी आहे की, तिला त्या काळी कोणत्याच धर्माची गरज भासली नाही. पुढे काही संधी-साधू धर्म मार्तंडानी त्यांच्या दृष्टीने धर्म नसलेल्या आदिवासींची उणीव बरोबर हेरली आणि आप-आपल्या धर्मांत आदिवासींना वाटून घेण्याचे काम सुरू झाले. आजही ही प्रक्रिया थांबलेली दिसत नाही. एकेविसाव्या शतकात आदिवासींना स्वतःची अस्मिता आणि अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी त्यांना स्वतंत्र धर्मांची गरज भासू लागली आहे, या पर्श्व भूमीवर आदिवासी धर्माचे सिंहावलोकन होणे करजेचे आहे.

इथली खरी गोची काय आहे, ती देखील आपण समजून घेणे गरजेचे आहे. आदिमांचा धर्म हा मातृसत्ताक पद्धतीला आदराने स्विकारणारा असून वैदिकांनी ह्याच गोष्टीवरून आदिवासी धर्माचा मुळापासून निःपात करण्याचे सत्र आरंभल्याचे दिसते. कारण त्यांना मातृसत्तेवर विश्वास ठेवणारा आणि श्रम, सहकार, सामुदायिकत्व, न्याय, करुणा, समता, सत्य, शील व 'कुलचिन्ह' या नऊ रत्नांच्या तत्त्व प्रणालीवर भर भक्कमपणे स्वतःच्या पायावर उभा असलेला, आणि जगाच्या कानाकोपऱ्यांतील विविध धर्मांची निर्मिती ज्याच्यापासून झाली, तो जागतिक स्तरावरचा अतिशय पवित्र आणि शांततेचा भोक्ता असलेला जगत् विख्यात 'निसर्ग धर्म'च मान्य नाही. म्हणून हे प्रदूषित आणि गढूळ वातावरण पाहायला आणि ऐकायला मिळत आहे.

आदिवासींच्या निसर्गाच्या चलतपटातून उदयास आलेल्या धर्मसंस्कृतीचा वेध घ्यायचा झाल्यास आपल्याला थेट आदिम काळात डोकावून

पाहावे लागेल. त्यांची धार्मिक आणि सांस्कृतिक मूल्ये तपासावी लागतील. पूर्वी टोळीने वावरणाऱ्या आदिवासींमध्ये टोळीचा म्होरक्या आपल्या सोबत्यांसोबत दुसऱ्या टोळीवर हल्ला करीत असे. त्यात साहजिकच बलाढ्य टोळी जिंकत असे. त्या वेळी जिंकलेल्या टोळीला हरलेल्या टोळीतील माणसांसोबत स्त्रियादेखील मिळत असत. त्या स्त्रिया मिळविण्यासाठी पुन्हा त्यांना लढाई करण्याची गरज भासत नसे. कारण आपली ओळख पटविण्यासाठी प्रत्येक टोळीतील स्त्रियांच्या हातावर आणि कपाळावर विशिष्ट पद्धतीने गोंदण्याची तऱ्हा असल्याने, त्यांचे पुन्हा तेवढ्याच आदराने स्वागत केले जाई. "दुसरी स्त्री मातेसमान मानण्याची पवित्र भावना तेव्हापासून मानली जाऊ लागली. ह्या विश्वासार्हतेलाच आदिवासी आपला धर्म मानू लागला.”

रानटी अवस्थेत टोळ्या-टोळ्यांनी वावरणाऱ्या आदिवासीला सुरुवातीला विवाहसंस्थेत अडकण्याची गरजच भासली नाही. कारण आदिवासींमध्ये मातृसत्ताक पद्धती अस्तित्वात असल्याने नराची निवड करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य स्त्रीला होते. तिला जर 'नर' चपळ दिसला नाही, तो कड्या-कपाऱ्यातून आणि अवघड झाडावरून सहजपणे उड्या मारण्यात कुठे थोडा जरी कमी पडला, त्याची क्षमता कमी वाटली तरी ती चुटकीसरशी त्याला बाजूला सारीत असे. आणि तिला योग्य असलेल्या नराचीच आपला जोडीदार म्हणून निवड करत असे, यालाच गोटूल असे संबोधले जाते.

गोटूल सारखी अतिशय पवित्र संस्था की, जेथे भावी वधू-वर एकत्र येवून आपला भावी जोडीदार निवडायचे, अशा ‘गोटूल’ संस्कतीवर त्या काळी कडाडून टीका झाली. हे तरूण-तरूणी एकत्र येतात आणि स्वैराचार माजवितात. त्यांच्या लैंगिक वासना शमविण्यासाठी त्यांच्यात खुला शरीर संबंध असतो, अशी टीकेची झोड होत राहिली. मात्र आदिवासी तरूण-तरूणींनी गोटूलला आपला पवित्र धर्म मानल्याने निसर्गाच्या साक्षीने आणि एकमेकांच्या सहमतीने एकत्र यायचे. अशा वेळी काही प्रमाणात त्यांचे शरीर संबंध येत ही असतील. मात्र ते एकमेकांच्या मर्जीविरोधात कधीच नाही. बलात्कार सारखा पाशवी शब्द त्याच्या शब्दकोशात चुकूनही सापडणार नाही. एवढे मोठे दायित्व आणि समाजाबद्दलची निष्ठा आपल्याला कुठल्याच धर्मात दिसणार नाही.

आपला उदरनिर्वाह करण्यासाठी कंदमुळांबरोबरच शिकारीला जाणारा पुरुष लवकर येत नाही, म्हणून गुहेच्या बाहेर येऊन आपल्या भुकेने व्याकूळ झालेल्या चिमुकल्याला काही मिळते काय? ते शोधण्यासाठी किलकिल्या नजरेने बघणाऱ्या स्त्रीने काही वृक्षांचे निरीक्षण केले. तेवढ्यात झाडावरून वाळलेले एक फळ खाली पडले. त्याच्या बिया अस्ताव्यस्त पसरल्या. त्या बिया वेचून तिने आपल्या गुहेच्या आणि नंतर झोपडीच्या आसपास आणून लावल्या. अंगणात कुंपण करून काही वेलभाज्या लावल्या, त्यातूनच तिने प्रथम शेतीचा शोध लावला. जो शिकवितो आणि जगवितो अशा निसर्गावर तिचा दृढ विश्वास बसला आणि आदिवासीने निसर्गराजाला आपला 'अधिष्ठाता' आणि 'धर्मज्ञाता' मानायला सुरुवात केली.

आदिवासी प्राण्यांशी, कृमी-किटकांशी आणि निसर्गातील सर्व घटकांशी बांधिलकी मानून त्यांच्या सहवासात आनंदाने राहू लागल्यावर त्यांच्या असे लक्षात आले की, प्राण्यांपेक्षा आपण काही बाबतीत नक्कीच कमी आहोत. म्हणजे आपल्याला खार आणि माकडासारखे का बरं चपळतेने झाडावर चढतां येत नाही ? असे काही प्रश्न त्याला पडतात न पडतात तोच, त्याचे उत्तरही त्याला मिळत असे. आपल्या हातांची बोटे एकमेकांच्या त्वचेला चिकटलेली आहेत, ती

वेगळी करण्यासाठी त्यांना पहिल्या दोन-तीन पिढ्या नक्कीच खपवाव्या लागल्या असणार. त्याने ह्या काळात केलेले संशोधन जर आपला धर्म मानून केले नसते, तर आज ही आपली सर्व दृष्टीने प्रगती झाली आहे, ती नक्कीच झाली नसती.

नुकताच कष्ट करून गंगेच्या आणि इतर नद्यांच्या दोआबात कुठे स्थिरावतो, तोच अशा जमातीना आर्यानी 'दस्यू' संबोधले. त्या वेळी अशा टोळयांना 'गण' म्हणून व गणांच्या प्रमुखांना गणनायक' संबोधले जाई. आदिवासी गणांची राज्ये हिमालयाच्या पायथ्याशी आणि सहयाद्रीच्या रांगेत वस्ती करून राहणाऱ्या डोंगरदऱ्यांतही होती. ही सर्व गणराज्ये आपली गुलाम व्हावीत, म्हणून त्यावेळच्या सम्राटांनी खूप प्रयत्न केले. त्या वेळच्या किती तरी गणराज्यांवर आक्रमणे करून गणांच्या नायकांना आर्यानी निदर्यपणे, अधर्माने वागवून ठार मारले. ह्या बाबतीत सम्राट चंद्रगुप्ताचा मंत्री कौटिल्य ह्याने लिहून ठेवले आहे की, "आदिवासी गणनायकांची आपापसात भांडणे लावून, त्यांना दारूचे व्यसन लावून, सुंदर स्त्रिया पाठवून ह्या गणांची शक्ती कशी कमी करता येईल, ते जाती निशी बघितले जात असे. अशा प्रकारचा कावेबाजपणा आदिवासीच्या रक्तात चुकूनही सापडणार नाही, तर धर्मात कुठून येणार?" वरील गणनायक म्हणजे आदिवासी धर्माचे प्रचारक म्हणून काम करत होते. असा धर्म समतेवर, श्रमावर आणि सहकारावर आरूढ झालेला होता.

अगदी रामायण, महाभारत, चार वेद, उपनिषदे, ब्राह्मण्यके, तैतिरीय संहिता, रावणसंहिता हा ग्रंयांचा विचार जरी केला तरी आपल्याला दिसेल की, आदिवासी धर्म संस्कृती किती महान आहे. मात्र अशा महान संस्कृतीला आर्यानी पायदळी तुडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला, कारण कुबेर हा रावणाचा ज्येष्ठ बंधू 'यक्ष' संस्कृतीचा पुरस्कर्ता होता, तर रावण 'रक्ष' संस्कृतीचा म्हणजेच 'रक्ष' धर्माचा पालन कर्ता होता.. 'रक्ष' धर्म म्हणजे वैदिक यज्ञ-कर्मकांडाच्या विरोधात शड्डू थोपटणारा धर्म होय. आपल्या निसर्ग धर्माचा बचाव करण्यासाठी 'रक्ष' संस्कृती निर्माण केली. 'रक्ष' म्हणजे स्वतः सह समाजाचे रक्षण करणे होय. अशा धर्मात रावणाने आदिवासींच्या सर्व गणांचा समावेश केला होता, मात्र लंकेत राहणाऱ्या ब्राह्मणांपासून अनेक अठरापगड जाती-जमातींच्या माणसांवर आपला 'रक्ष' धर्म लादण्याचा कुठेही खटाटोप केला नव्हता. तरी 'रक्ष' धर्माचा प्रसार झपाट्याने होत होता. त्यामुळे रक्ष धर्माचा प्रसार करणारे रक्षक (राक्षस) हे आर्याचे मुख्य शत्रू बनले आणि त्यांनी 'रक्ष' धर्माचा नायनाट केला.

पुढे खूप काळ लोटला आणि १९ व्या शतकात बिहारमधील रांचीजवळ एका खेड्यात जन्मलेल्या बिरसा मुंडाला आदिवासी धर्माने पछाडले. आपला निसर्गधर्म असताना इथले इतर धर्मीय आपल्याला छळतात, आपल्या देवादिकांची टिंगल करतात म्हणून बिरसाने त्या काळी 'बिरसा धरम' स्थापन करून त्याला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान तर दिलेच, शिवाय आपल्या अनुयायांमार्फत, सगळीकडे प्रचारही केला. मात्र इतरांनी दुर्लक्ष केल्याने 'बिरसाधरमा'ला प्रतिसाद मिळाला नाही.

विदर्भात 'कोयतूर धर्म' उदयास आला. त्यातूनच गोंडी धर्म चळवळ उदयास आली. आजही तेथील आदिवासी आपला 'कोयतूर' धर्म पाळतात. मात्र तो संपूर्ण आदिवासी समाजाला एका छत्राखाली आणणारा धर्म नसल्याने, त्यात तशी मूल्ये नसल्याने, ह्या धर्मालाही उतरती कळा लागली. सन १८३८ साली तळोदा तालुक्यात आदिवासींचे संत आप श्री. गुल्या महाराज हयांनी त्या काळी एक मोठी धर्मपरिषद 'आप मंडळ' म्हणजेच 'आप' धर्म स्थापन करण्याचा क्रांतिकारी विचार मांडला होता. आपल्या भिल्ल बांधवांना एकत्र करून ह्या धर्माची स्थापना होणे किती

गरजेचे आहे, ते पटवून दिले होते. त्यासाठी आदिवासी बांधवांनी संत श्री. गुल्या महाराजांना 'आपश्री' ही उपाधी बहाल केली होती. असे असताना हिंदू धर्मापुढे ह्या धर्माचा काही निभाव लागला नाही, आणि देव-देवतांपासून सर्व धार्मिक विधी हिंदूनी आदिवासीवर लादल्याचे स्पाट झाले. हे सर्व थोपवायला आता जरा जड जात असले तरी सर्वानी कंबर कसून कामाला लागले तर आदिवासीचा निसर्गधर्म पुनरुज्जीवित व्हायला फार वेळ लागणार नाही. जो धर्म विज्ञानावर आधारलेला आणि सर्व जगातील आदिवासी जमातीना सामावून घेणारा असेल, अशाच धर्माची खरी गरज त्यांना वाटते.

आदिवासींना धर्मच नसेल तर काय होऊ शकते, हे आपण उघड्या डोळयांनी पाहतच आहोत. मुळात धर्म ही अफूची गोळी नसून त्या-त्या समाजासाठी एक आदर्श जीवनप्रणाली आहे. 'कोणत्याही धर्माचे मानवी जीवनातील स्थान अतिशय महत्वाचे असते. मानवी जीवनातून धर्माला बाजूला काढणे म्हणजे दोरा तुटलेल्या पतंगासारखीच गत त्या समाजाची नाही का होणार ? हे एक महत्त्वाचे सूत्र आपल्याला विसरून चालणार नाही, ते म्हणजे माणसांनी आपल्या सोईसाठी धर्म निर्माण केला आहे; धर्माने माणूस नव्हे! आज धर्माने माणसाला सदाचाराने, नम्रतेने वागायला शिकविले आहे. जर ही उच्च कोटीची तत्त्वे मानवी जीवनात धर्म संस्काराच्या माध्यमातून आली नसती, तर मनुष्यप्राणी प्राण्यांपेक्षाही हीन जीवन जगत राहिला असता. परंतु आज मनुष्य विविध धर्माच्या माणसांशी अतिशय आपुलकीने आणि जिवाभावाने जो काही वागतो, व्यवहार करतो त्याचे कारण म्हणजे त्याच्यावरील धार्मिक संस्कार होत. म्हणूनच तर धर्म माणसाला माणूस म्हणून त्याच्या समाजाचा एक घटक म्हणून आणि संस्कारमयरीत्या जीवन जगायला शिकवितो. असे असताना आदिवासींनी संपूर्ण जगाला निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपल्या धर्माचे आणि संस्कृतीचे जतन करण्याचे वस्तुपाठ शिकविले. अनेक पिढ्यान् पिढ्यांत हे पारंपरिक ज्ञान पसरविले. आज हेच लोक हाकाटी करू लागले आहेत की, आदिवासींचा वेगळा धर्म नसून हिंदू धर्म हाच त्यांचा खरा धर्म आहे.

अशा वेळी आपल्याला आदिवासीच्या सामाजिक आणि धार्मिक नीतिमत्तेचा विचार करवा लागतो. त्यातील सामाजिक मूल्ये बघावी लागतील. उदा. 'मे' महिन्याच्या अखेरीस पाऊस पडून गेला की, भुईच्या पोटातून विविध भाज्यांचे कोंब उगवतात. ते कोंब भाज्या म्हणून खाण्याआधी आदिवासी आपल्या निसर्ग-देवतेची, कणसरी मातेची पूजा करतात. काही महत्त्वाच्या भाज्या शिजवून त्याचा निसर्गदेवतेला नैवेद्य दाखविल्याशिवाय ते एक घासही खात नाहीत. हा विधी झाल्यावर जनावरे आणि माणसे तेथील वेलभाज्या आणि पालेभाज्या वाटून खातात. इतकेच नव्हे तर न्याहरीला आपल्या मांडीला मांडी घालून गुलब्या वा खंड्या कुत्र्यालाही ताट वाढले जाते, आणि जी काही शिळीपाकी भाकरी वा कोंड्याचा मांडा असेल ते दोघेही वाटून खातात. त्यातीलच काही तुकडे कुस्करून चिमण्यांना, मुंग्यांनाही भरविणारा आदिवासी 'माणुसकी' हाच आपला धर्म पाळतो. त्यानेच त्यागाची भावना स्विकारून 'जगा आणि जगू द्या' ही जीवनप्रणाली प्रत्यक्षात आणली आहे. कारण आदिवासींचा धर्म माणसांना, कृमी-किटकांना आणि प्राणी, पशु-पक्ष्यांना मैत्रीचे तत्त्वज्ञान शिकवितोच, शिवाय त्यागाची भावनाही रुजवितो.

भादव्यात आणि आश्विनात पिकांच्या बाजूला कुर्डूची, बरकीची, काठ-माठाची, राजगिरा अशा कितीतरी भाज्या येतात. तर मार्गशीर्ष महिन्यात हरभऱ्याची आणि त्याच्याच शेजारी चिलाची भाजीही उगवते. ह्या सर्व भाज्या आदिवासी आपल्या आहारात

वापरतात. मात्र ह्या भाज्या ते उपटून कधीच घेत नाहीत, तर फक्त त्यांची कोवळी पाने आणि टांभे खुडून घेतात. त्यांना निसर्ग धर्म चांगलाच माहीत असल्याने त्या भाज्या अधिकच फुटून डवरतात, त्यांचा चांगलाच विस्तार होतो. अशा कितीतरी भाज्यांच्या सुफलीकरणाचा महत्त्वाचा धर्म आदिवासींकडून नित्यनियमाने पाळला जातो. अशा धर्माविषयी काहींनी आपली मते नोंदविली आहेत, ती देखील विचारात घेण्यासारखी आहेत. ‘धर्म ही मानवी मनाची अभिव्यक्ती आहे’ असे फ्रॉइडने म्हटले आहे. निसर्ग आणि मानवसमूह या दोहोंकडून मिळणाऱ्या यातना आणि मनुष्याची असाह्यता सहन करता यावी, यातूनच धर्म कल्पना उदयास आली असावी, तर मार्क्सच्या मते, 'धार्मिक सत्ता ही सामाजिक, आर्थिक शक्तीची निर्मिती आहे.' ‘धर्म म्हणजे केवळ अध्यात्म नव्हे’, असे क्लिफर्ड गील्र्स यांनी म्हटले आहे.

आज तर ब्राम्हणांनी आदिवासी म्हणजे मागासलेले 'हिंदू' असा शिक्कामोर्तब करून त्यांना उपरोधिकपणे 'वनवासी' ही पदवी ही बहाल केली आहे. एकंदरीत आदिवासीना हिंदू, मुस्लिम, खिश्चन या धर्मात सामील करण्याचा कट फार पूर्वीच रचला गेला. ज्या वेळी आदिवासी शिकले-सवरले नव्हते, त्या वेळी अतिशय नियोजनपूर्वक खेडोपाडी आणि डोंगरदऱ्यांत ब्राह्मण शिक्षक म्हणून पोचले, आणि प्रथम कोणते काम केले तर आदिवासी विद्यार्थ्यांच्या नावापुढे 'हिंदू' असे रेकॉर्डला नोंद करण्याचे कारस्थान त्यांनी केले. आणि आदिवासी पुर्वीचे हिंदू आहेत, असे सांगायला सुरुवात केली. मात्र आर्यानी डोंगरदऱ्यांत आणि जंगलबहूल भागात हाकलून दिलेला आदिवासी एकदम हिंदू कसा काय असू शकेल? हे उघड उघड गौडबंगाल नाही काय ?

आदिवासींच्या त्यागी निसर्गधर्मात साठा आणि संग्रह करण्याची शिकवण नसल्याने शहरवासीयांप्रमाणे शीतपेटीत काही ठेवायचे असते आणि त्यातील बऱ्याच कॅलरीज नष्ट झाल्यावर तो पदार्थ खायचा असतो, हे निसर्गाच्या सान्निध्यात राहून हे करायला आदिवासी इतका काही दूधखुळा राहिलेला नाही. हे त्याच्या धर्मात आणि संस्कृतीत बसणारे नाही. त्याला रोज हवे तेवढेच ताजे अन्न तो जंगलातून मिळवितो आणि ओहोळाचे ताजे पाणी प्राशन करून गुण्यागोविंदाने पर्यावरणाला कुठेही गालबोट लागणार नाही, ह्याची दक्षता घेत आपला निसर्गधर्म काटेकोरपणे पाळतो.

सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, आदिवासींकडे पाहण्याचे दिवस अजूनही बदलेले नाहीत, ही मोठी खंत आहे. आजमितीला आदिवासींना धर्मच नाही असे बोलायचे आणि त्यांच्या कार्यात आडकाठी आणायची ही इथली रीत. पृथ्वीतलावर प्रथम ज्याने धार्मिक घडी बसविण्याचे अवघड कार्य केले, त्याला आज धर्म नाही म्हणजे काय? त्यामुळे आता आदिवासींच्या निसर्गधर्माची घोषणा करून त्याला पुनरुज्जीवित करून वाटचाल करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आज पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर, धुळे आणि अखिल भारतभर सर्वच बर्निंग स्पॉटवरून ही घोषणा होईल आणि आदिवासी धर्माची पताका मोठ्या डौलाने संपूर्ण जगात फडकेल, किंबहुना हेच उद्याचे चित्र असू शकेल !

**संदर्भ ग्रंथ:**


1. आदिवासींचे सण-उत्सव - डॉ. सरोजनी बाबर
2. आदिवासी मराठी साहित्य - प्रतिमा प्रकाशन पुणे, 2007 पृष्ठ 50
3. आदिवासी साहित्य - दिशा आणि दर्शन - डॉ. विनायक तुमराम
4. धर्म, मानवी संस्कृती व विकास - डॉ. रावसाहेब कसबे.